# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल/४४३/२०१५

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत असलेल्या कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वास्तुशास्त्र व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, एप्रिल, २०१५ मध्ये होऊ घातलेल्या विद्यापीठ घेत असलेल्या काही परीक्षांचे परीक्षा अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत संपून गेलेली आहे मात्र काही विद्यार्थी काही कारणांमुळे परीक्षाअर्ज भरू शकलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज स्विकारण्यासंबंधीचे विनंती अर्ज प्राप्त झालेले आहेत. या अनुषंगाने ज्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत निघून गेलेली आहे व जे काही विद्यार्थी काही कारणास्तव परीक्षा अर्ज भरू शकलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे परीक्षा फॉर्म सादर करण्यासाठी अंतिम संधी देण्यात येत आहे :—

| परीक्षा शुल्क व | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | परीक्षा अर्ज व विहित फी विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|
| अतिविलंब शुल्क रू. ५००/— | १७ मार्च, २०१५ ते २३ मार्च, २०१५ | २५ मार्च, २०१५ पर्यंत |

तरी संबंधीतांनी वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

<u>**( टिप :— ज्या परीक्षा मार्च महिन्यात सुरू होत आहेत अशा परीक्षांकरीता वरील परिपत्रक लागू नाही.)**</u>

स्थळ : मुंबई.
दि. १७ मार्च, २०१५.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत असलेल्या कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव